ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 9 | ISSUE - 8 | APRIL - 2023

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# माना व गोंड जमातीतील सामाजिक विभिन्नता



**प्रा. संदीप पुंडलिक नन्नावरे**
**सहाय्यक प्राध्यापक ,**
**महात्मा फुले महाविद्यालय पिंपरी, पुणे .**

**प्रस्तावना :-**

माना जमातीच्या मुळनिवासस्थान या संदर्भात अजूनही मत भिन्नता दिसून येत असली तरी ते वास्तविक पणे मुख्यत: सातपुडा पर्वताच्या खालचा भाग म्हणजे पूर्वीच्या दंडकारण्यातील पूर्वेकडील भाग पूर्वीचा मध्य प्रांतातील विशेषत: बालाघाट जिल्ह्यातील आत्ता महाराष्ट्रातील पूर्व विदर्भातील जिल्ह्यामध्ये विशेषता वैनगंगेच्या पश्चिम किनाऱ्या पासून ते वर्धा नदीच्या पूर्व किनाऱ्यातील जंगलमय पट्टयात प्रामुख्याने ग्रामीण डोंगरी जंगल खोऱ्यामध्ये वसलेले आहेत. मुलुखगिरी करता करता काही माना जमातीचे लोक बस्तर मार्गे चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात स्थिरावले. पुढे कामाच्या शोधात टोळ्या टोळ्यानी अत्यल्प प्रमाणात पूर्व विदर्भातील नागपूर, भंडारा, यवतमाळ, अमरावती, अकोला इत्यादी जिल्ह्यामध्ये विखुरलेले आढळतात.[१]

भारतातील आदिवासी जमातीपैकी संख्येने सर्वात मोठया जमातीपैकी एक अशी ही गोंड जमात आहे. थेट ओरिसापासून मध्यप्रदेश, छतिसगड, महाराष्ट्र आणि आंध्रप्रदेश या भागात पसरलेली ही जमात आहे महाराष्ट्रात विदर्भातील आदिवासी जमातीमध्ये सर्वात मोठी जमात म्हणून गोंड जमात ओळखली जाते. गोदावरी नदीच्या प्रदेशात तसेच बस्तर आणि सातपुडा पर्वतरांगांच्या प्रदेशात गोंड लोकांची वस्ती दाट आहे. महाराष्ट्रात विदर्भामध्ये गोंडांची लोकसंख्या जास्त असून ११.३७% इतके त्यांचे प्रमाण आहे.[२] त्यातही चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, यवतमाळ, भंडारा, गोंदिया या जिल्ह्यात त्यांचे प्रमाण हे जास्त आहे.

## ३.१ शारीरिक ठेवण-

माना जमातीचे बहुतांश लोक अंगकाठीने ठेंगण्या बांध्याचे, काटक लहान डोळ्यांचे,काळ्यासावळ्या रंगांचे, पसरट चेहऱ्यांचे, बसक्या व पसरट नाकाचे, जाड ओठ वरचा ओठ किंचित उंचावलेला मेहनती कष्टाळू वृत्ती, लाजाळू वृत्तीचेआहेत.[३] माना जमातीतील बहुतांश स्त्रिया या सावळ्या, मध्यम बांध्याच्या व उंचीच्या दिसून येतात. पूर्वीच्या काळातील स्त्रिया हातावर, पायावर,कपाळावर, बोटावर गोंदन करत असल. गोंदवून घेणे म्हणजे अंगावर अलंकार धारण केल्यासारखे त्यांना वाटत असावे अथवा परंपरागत पद्धतीने हि प्रथा चालत आलेली असल्यामुळे कदाचित गोंदवून घेतले जात असावे. आता आधुनिक काळात बऱ्याच प्रमाणात हि गोंदवून घेण्याची प्रथा माना समाजातील स्त्रिया मध्ये बंद झालेली दिसून येते.

सामन्यात: गोंड जमातीतील लोक मध्यम उंचीचे व रुंद चेहऱ्याचे दिसून येतात. त्यांच्या नाकाचा आकार काहीसा मोठा मागच्या बाजूला पसरत अश्या स्वरूपाचा दिसून येतो. डोळ्याच्या खोबण्या थोड्या खोल गेलेल्या पण ठळक दिसून येणारे. त्यांचा त्वचेचा रंग तपकिरी, सावळा ते काळा ३ अश्या स्वरूपाचा दिसून येतो ओठाचा आकार जाड असलेला. तसेच डोक्याचे केस माने पर्यंत वाढविलेले दिसून येतात. गोड स्त्रिया मध्यम उंचीच्या तपकिरी वर्णाच्या भारदार शरीरयष्टी डोलदार बांध्याच्या दिसून येतात.[४]

गोंड समाजाच्या चेहऱ्याची परिमाणे

| | |
|---|---|
| डोक्याचा घेर (मि.मि.) | ५२८.६१ |
| डोक्याच्या सापेक्ष प्रमाण | ७६.३६ |
| नाकाच्या उंचीचे प्रमाण | ११०.८७ |
| नाकाच्या लांबी-रुंदीचे सापेक्ष प्रमाण | ८३.८९ |
| वरच्या जबडयाच्या लांबीचे प्रमाण | ४५.९० |

चेहरा व डोके यांच्या रुंदीचे प्रमाण  ९५.५४. [५]

### ३.२ कुटुंब व्यवस्था -

सदस्याच्या आप्त संबंधाच्या बंधनांवर आधारलेल्या सामाजिक समूहाला कुटुंब असे म्हणतात. आप्त संबंध हे रक्ताच्या नात्याने प्रस्थापित होत असतात.माता-पिता व त्यांची मुले यामध्ये असे रक्ताचे नाते असते.विवाहसंबंधावर कुटुंबाची उभारणी होत असते.[६] आदिवासी माना जमातीमध्ये कुटुंब व्यवस्थेला अनन्यसाधारण महत्व आहे. माना आदिवासी जमातीतील कुटुंब व्यवस्था संयुक्त कुटुंब असल्याचे दिसून येते. कुटुंब व्यवस्थेत वडीलअसलेल्या पुरुषाचा प्रभाव असला तरी स्त्रियांना मानाचे स्थान कुटुंब व्यवस्थेत दिसून येते. तसेच सयुक्त कुटुंब पद्धतीचा एक फायदा हा की या कुटुंब व्यवस्थेत शेतीसाठी पुरेशे मनुष्यबळ मिळत असते. कालपरत्वे माना समाजातील कुटुंब व्यवस्थेत विभक्त कुटुंब पद्धती दिसून येण्यास सुरुवात झालेली आहे. कारण आर्थिक स्त्रोत प्राप्त करण्याकरिता बाहेरगावी जाणाऱ्यांचे प्रमाण वाढलेले आहे. शेती व शेतमजुरी हा माना जमातीचा मुख्य व्यवसाय असल्यामुळे ग्रामीण भागात काही प्रमाणात अजुनही कुटुंब मोठ्या स्वरूपाचे दिसते.

### ३.३ पोटजाती -

माना आदिवासी जमातीत सुद्धा काही मुख्य पोटजातीचा उल्लेख आहे.

१) प्रमुख्याने वर्धा व वैनगंगेच्या दुआबात असणारी, तसेच नागपूर, बालाघाट, भंडारा गोंदिया व चंद्रपूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात वास्तव्य असलेली माना जमात,या लोकांना भाट असतात. दरवर्षी हे भाट वर्षातून एकदा प्रत्येक कुटूंबाला भेट देतात व कुटुंबातील पुर्वजांची स्तुती करतात व वर्तमान पिढीला आर्वा िद देतात. पुर्वीची ही जमात राज्यकर्ती जमात असल्यामुळे कुटुंबातील अशा प्रकारचे स्मुती पाठक बाळगण्याची प्रथा त्या काळात असावी व तीच परंपरा नवीन पिढीत चालत का आहे.

२) नागपूर काटोल या भागातील भाट नसलेली जमात - जामिनदाराकडे हिशेब लिहीणारी व स्वतःमालगुजारी  व इतर कामे करून प्रामुख्याने शेतीवरील कामे करणारी जमात म्हणुन ओळखली जात होती.

3) माना कुणबी - यांनाच ' मानवा" असे म्हणतात. माना जमाती मधील पोट जात आहे.जमात प्रमुख्याने चांदा जिल्हयात आढळते. ते बहुदा शेतकाम करतात  व वंश परंपरेने एकाच मालगुजाराकडे राहतात. यांच्यात कुळनावे आहेत एकाच कुळनावाच्या माणसाचे विवाह  होत नाही, वास्तवीक ही वेगळी अशी माना जमात नाही रानावनातील  बिनभरोश्या भटके जीवन जगण्यापेक्षा स्थीर शांततामय जीवन जगण्याचे दृष्टीने मानांनी अंगीकारलेले हे काम अशिक्षित पणामुळे रेकार्डवर माना आहे की माना कुणबी आहे हे त्यांना समजून घेण्याची गरजच वाटली नाही.मात्र जे माना शेती करू लागले त्यांनी यात चांगली प्रगती केली असा चंद्रपूर गॅझेटमध्ये उल्लेख आहे.[७] ज्या मालगुजाराकडे ते काम करित असत त्यांनाही मानांविषयी सखोल जाणून  घेण्याची गरज वाटली नाही सारखेपणामुळे माना हे कुणबीच आहेत अशी समजुतीतून झाली.माना कुणबी असा रिकार्ड झाला असावा माळगुजारकडे काम करताना त्यांची सचोटी, प्रमाणीकपणा मालकाशी व त्यांच्या कुटुंबाची वचकून राहण्याची वृ ती व काष्टीक स्वभाव आपण व आपले काम या प्रधान्य देण्याची वृ ती तसेच भित्रा (वाघाला नव्हे पण माणसाला विशेषत:पोशाखी माणसाला) स्वभाव अल्पसंतुष्टता यामुळेच ते पिढयापिढया एकाच मालगुजाराकडे टिकत होते. काही मालक व शेतमजूर ध्याचे संबंध इसके जिव्हाळ्याचे असत कि ते एका परिवाराती घटक आहेत असे वाटावे. तत्कालीन मानांची जी मुले शिक्षण क्षेत्रात आली ती बहुदा अशा मालगुजारांच्या प्रेम प्रेरणेमुळे.. सहकार्यामुळेच [८]

भारतातील आदिम जमातींमध्ये संख्येने फार मोठी व मध्य भारतात विस्तृ त प्रमाणावर पसरलेली अत्यंत पुरातन अशी ही गोंड जमात आहे. महाराष्ट्रात प्रामुख्याने चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात आणि यवतमाळ व आदिलाबाद (आन्ध्रप्रदेश) जिल्ह्यांच्या सीमारेषेवर तसेच नागपूर जिल्ह्यात गोंड जमातीचे लोक आढळतात. गडचिरोली जिल्ह्यात गोंडामधील राजगोंड, माडिया गोंड, धुवं आणि खातुलवार गोंड या चार उपजमाती आढळतात.  १) राजगोंड २) मारीया / माडीया ३) धुर्वे ४)खटुलवार

१) कोया २) गैंता या सर्व जाती गोंडी बोली बोलतात राजगोंड मारियागोंड या चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील प्रमुख गोंड जमाती धुर्वे गोंड दुर्गच्या बार्डरवर प्रमुख व कोया हे दक्षियोकडून (आंध्र)मधून आलेले आहेत. गैंता ही गोंड जमात खास जुने गोडी रिवाज व परंपरा टिकवून ठेवणारे त्यांची घरे म्हणजे पूर्व पश्चिम एकमेकाकडे तोंड करून असलेली झोपड्यांची रांग असते.[९]

चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील गोंड जमातीचा अभ्यास मानवी वर्तनाचा अभ्यास ऐतिहासीक अभ्यासाच्या दृष्टीने मनोरंजक आहे. काही शतके पर्यंत चंद्रपूर जिल्हयातील एक प्रभावी व प्रस्थापित जात म्हणून त्यांचा उल्लेख करता येयील. वैनगंगा नदीच्या दोन्ही बाजूला विशेषतः पूर्व बाजूस दूरवर ही जात प्रस्थापित झालेली आहे. त्यांची विभागणी चार प्रमुख जमातीमध्ये झालेली आहे. त्या चार जमाती

१) राजगोंड

२) मारिया / माडीया गोंड

३) धुर्वे गोंड

४) खटूवार गोंड या शिवाय १) कोया आणि २) गैता या उपजमाती आहेत. चंद्रपूर जिल्हयात राजगोंड वैनगंगेच्या दोन्ही बाजूल दूरवर पर्यंत, माडिया गोंड पूर्वेला छतीसगडच्या सीमेपर्यंत धुर्वे गोड प्रमुख्याने दुर्ग, रायपुर जिल्ह्याच्या सीमेलगत, खटुळवार गोड जिल्ह्याच्या उत्तर सीमेकडे छतीसगडच्या (पुर्वीच्या मध्यप्रदेशातील) दुर्ग जिल्ह्याच्या सीमेपर्यंत प्रत्यापित झालेले आहेत. धुर्वे गोड स्वतः सैनिकाचे वंशज समतात स्वतःला नाईक म्हणून संबोधतात. खडुलवार गोंडानी मात्र हिन्दुचे बरेच रितीरिवाज स्विकृत केले आहेत. ते स्वतःला ठाकूर म्हणवून घेतात. मेजर लुईस म्हणतात त्याप्रमाणे त्यांच्यात जनुकाही रजपूत रक्त त्यांच्या शिरातून वाहते आहे अशी त्यांची धारणा आहे.[१०]

गैता गोंड संख्येने कमी असले तरी त्यांची दखल घ्यावीच लागते गोंडाचे जुने रितीरिवाज आजही त्यांनी प्रचलीत ठेवले आहेत. जसे की त्यांची घरे पूर्व आणि पश्चिमेला तोंड असलेली दोन रांगेत वसलेले खेडे असते. दोन रांगांच्या मध्ये जवळ जवळ ८० फूट अंतर असते. या झोपड्यात लग्न झालेली जोडपी राहतात- अविवाहीत मुले गावातील घरांच्या रांगेच्या शेवटी त्यांकरिता खास तयार केलेल्या झोपडीत राहतात. अशाच प्रकारची स्वतंत्र व्यवस्था अविवाहीत मुलींकरिता गावाच्या दुसऱ्या टोकाल केलेली असते.[११]

राजगोंड,माडिया गोंड यांनी चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्याचे बरेचसे क्षेत्र विशेषता पूर्व व दक्षिण भाग व्यापलेला आहे. माडिया आजही सुसंस्कृत समाजाच्या दृष्टीने फारच मागासलेले आहेत. त्यांचे वसतीस्थान घनदाट जंगलात एखाद्या शांत पाणवढ्याजवळ वसलेले असते. जेणे करून पाण्याशी संबंधीत त्यांच्या मूलभूत गरजा भागू शकतात. तर भोवतालच्या जंगलातून त्यांना खाण्यासाठी कंदमुळे, फळे य शिकार मिळते, ते त्यांच्या प्रचलित पद्धतीने शेती देखिल करतात.[१२]

गडचिरोली जिल्ह्यातील बहुतेक माडिया गोंडांच्या खेड्याच्या आसपास ताडीचे वन (आंब्याच्या आमराई सारखे) असते. ताड़ी काढने व पिणे हा माडीयाच्या जीवनातील अविभाज्य भाग म्हणता येयील, ताडी ताजी असो वा आमलेली माडीयाला वर्ज्य नाही. माडीया पुरुष कृतिशील व सुदृढ व्यक्तिमत्वाचा असतो. निरनिराळे चर्म रोग आणि मातेचे वाण व महारोग त्याला ते 'गोंडीरोग' म्हणतात. त्यामुळे त्याला विद्रुपता आलेली असले.[१३]

राजगोंड प्रमुख्याने वैनगंगेच्या दोन्ही बाजूला वसलेले आहे. काही माडीया गोंडाच्या प्रदेशात देखील आहेत. माडीयापेक्षा ते अधिक सुसंस्कृत असून हिंदूंच्या संपर्कात असल्यामुळे बरेचशे हिन्दु रितीरीवाज त्यांच्या अंगवळणी पडले आहेत.

मेजर लुईम स्मिथच्या मते त्यांनी “राजगोंड” हे नाव धारण केले आहे कारण ते राजघराण्याची संबंधीत आहे. कदाचित त्या जमातीतील त्या काळात ते सर्वशक्तीमान होते. त्यावेळी चंद्रपुरात त्यांची सत्ता होती. आज हे प्रामुख्याने कुळाने शेती करतात किंवा शेतमजुरी करतात. जंगलाशेजारचे रहिवाशी असल्यामुळे जंगलातली कामे हाही त्यांचा उद्योग आहे. बरेचशे लोक जंगल खात्यात नोकरीला सुद्धा आहेत. त्यांच्या पारंपारीक रिवाजानुसार लग्नसमारंभ, मृत्यू समारंभ, सण संस्कृतीक उत्सव यात माफक प्रमाणात दारु पिणे त्यांचा रिवाज आहे.[१४]

बाहुतेक गोडच्या सांस्कृतिक परंपरा सारख्याच आहेत. त्यांचे नग्न समारंभ, जन्म मृत्यूचेसंस्कार, स्थानिक लोकांच्या संपर्कात आल्यामुळे काही बदल होऊ शकतो दैवतीकरणाच्या संकल्पनेतून देवांच्या संख्येवरून गोंडांचे देवक (गट) पडलेले आहेत. प्रत्येक गटाचे निसर्गातील प्राणी, पक्षी हे त्यांचे दैवताचे प्रतिक आहेत.

सहा देवे व त्याच प्रतिक हे राजघराण्याचे प्रतिक समजले जाते. प्रत्येक गटातून कुळ म्हणून पोटविभागणी केली आहे. जसे राजगोंडाची २८ कुळे आहेत तर माडियांची२४ कुळे आहेत. धुर्वे गोंडाची १७ कुळे आहेत. गोंड राजाचे कुळ आत्राम आहे. गोंडांचे त्यांच्या गटात विवाह संबंध होत नाही तर मुलगा किंवा मुलगी वेगवेगळ्या गटातून पाहिजेत. त्यामुळे असे लक्षात येते की खेड्यात एका गावात गोंडाची कमीतकमी दोन कुळे असतात.१५

पेरसापेन हे गोंडांचे प्रमुख दैवत आहे. खिळयाच्या किंवा लोखंडी साखळच्या स्वरुपात त्याची पूजा करतात, अशा प्रतिमा माडिया गोंड तयार करतात. बांबूच्या नळीत बंद करून त्या विकायला असतात. पूर्वी परसापेनला मानवी बळी दिला जात असे. मानवी रक्ताने माखलेले भाल्याचे टोक देवाच्या अंगावर पाण्याने धुतले जात. पूर्वी दसऱ्याचे दरम्यान मानवीबळी देवाला देण्याची तसेच मानवी रक्त पिकावर शिंपडण्याची प्रथा होती. बळी देण्याकरिता माणसे पकडून आणणारे 'हिंदकूरीस' नावाचे टोळके हे काम करीत असे. आज ही प्रथा प्रचलीत नाही.[१६]

पूर्वी पेरसापेण ची पूजा करताना जमिनीवर भाल्याची टोके स्थापीत केली जायची. त्या कुळाची जेवढी देवांची संख्या असेल त्यापेक्षा संख्येने एक जास्त भाल्याचे टोक स्थापित केले जात असे. समजा पाच देव कुळ असेल तर सहा भात्याची रोक स्थापित केली जाते सहावे टोक म्हणजे पेरसापेनची प्रतिमा. हे सर्व भाले एक पिशवीत भरून झाडाच्या फांदीला लटकवून ठेवली जात असे बळीचे रक्त भाल्यावर (देवाच्या प्रतिमा) शिंपडले जाई मोठी प्रतिमा म्हणजे परसापेन होती त्यावर ते प्रथम शिंपडले जाई.

पेरपेरसापेन व्यतिरिक्त दैवतांची पूजा केली जाई, जसे की माराई (देवी) भिमसेन इ. स्थानिक दैवतात ताडोबा, वाघोबा यांचे पूजन होते. हे देव प्रत्येक संकटाचे वेळी गावाचे संरक्षण करताल अशी समजूत आहे. आत्म्याच्या अमरत्वावर त्यांचा विश्वास आहे. मृत झालेल्या व्यक्तीचे डोके ज्या ठिकाणी जामनिला टेकत होते तिथे रात्रीच्या वेळी धान्याचा छोटा ढीग केला जाते त्यावर टोपले ठेवले जाते व त्यावर दिवा ठेवला जातो. तो दिवा रात्रभर जळत असतो पहाटेच्या वेळी तो दिवा विझविला जातो व टोपले

उचलले जाते पुढच्या जन्मी मृत व्यक्ती ज्या प्राण्याच्या जन्मात जाईल त्याचे पाय त्या धान्याच्या ढीगावर उमटलेले दिसतात. म्हणजेच मृताचा आत्मा दुसऱ्या जन्मी जातो तो मरत नाही. ही त्यांची श्रध्दा आहे. आता नवीन शिक्षणानुसार नवपिढी या पूर्व कल्पनांना मानत नसल्याचे दिसून येते.

### ३.४ विवाह समारंभ -

मानवाच्या वर्तनावर त्याने निर्माण केलेल्या सामाजिक संस्थाचे नियंत्रण असते, त्यापैकी विवाह ही एक संस्था आहे. आदिवासी समुदायातही विवाह ही संस्था व्यक्तिच्या वर्तन नियत्रंणाचे कार्य करीत असते. "विवाह या शब्दाचा अर्थ वि + विवाह = वाहून नेणे किंवा उचलून नेणे असा होतो." [१७]

विवाहाच्या विविध मान्यवरांनी व्याख्या केलेल्या आहेत, असे दिसून येते, व विवाहाच्या कोणत्या ना कोणत्या वैशिष्ट्यांवर या व्याख्या भर देणाऱ्या वाटतात. म्हणजेच दोन किंवा भिन्नलिंगी भागीदार असणारा, समाजाने मान्यता दिलेला, साधारणतः दीर्घकाळ टिकणारा, औपचारिकपणे अस्तित्वात येणारा आणि भागीदाराचे कर्तव्य, अधिकार निर्माण करणारा संघ म्हणजे विवाह होय. अशी सर्वसाधारण विवाहाची व्याख्या केली जाते.

### ३.४.१ माना जमातीचे विवाह कार्यक्रम -

"माना" जमातीत बालविवाहाची पद्धती होती. दोन-तीन वर्षाचा मुलगा आणि मुलगी असतांना विवाह जमात पंचायती मार्फत जोडण्यात येत असत. वर-वधु सज्ञान झाल्यानंतर मुलीला मुलाचे घरी पाठवत असत. जमात पंचायत प्रमुखास शेंडे म्हणत. जमात पंचायतीला वधू-वर पक्षांकडून दहेज अथवा देणगी द्यावी लागत असे. त्या देणगीतून आलेली रक्कम खर्च करून पंचायतीचे लोक आपल्या देवाची डहाका वाजवून कुलदेवी, कुलदेवतांची पूजा करून, कोंबड्या/बकऱ्याचा बळी देऊन सामूहिक भोजन करत होते. वर पक्षाकडून वधू पक्षाला ठराविक धान्य व रोकड पैसा स्वरूपात देज म्हणून देण्याचे कबूल केल्या शिवाय लग्न जोडले जात नसे. हळूहळू त्यामध्ये परिवर्तन होत आहे.[१८]

माना समाजातील सांस्कृतिक रीतीवाजांचे सांगितलेले अनुभव लग्नसमारंभ व शिष्टाचार लग्न जुळवितांना प्रथम मुलगी पहायला जात असत. सोबत सोयरे विशेषतः मुलीचा मामा असे लग्न जुळवितांना वधू वरांच्या रंगरुपापेक्षा सांपत्तीक स्थितीचा व जवळच्या नातेसंबंधांचा विचार करत असतो. मामाच्या मुलीचा प्रथम विचार केला जातो.तसेच सांपत्तीक दृष्ट्या अनुरूपतेचा विचार केला जात असे. लग्न ठरताना मुलीला देज (एकप्रकारचा हुंडा) म्हणून ९ कुडव किंवा खंडीभर (जवळ जवळ २ क्विंटल) बगड (उखळामध्ये मुसळाने धान कुटून तयार केलेले तांदूळ) दयावी लागत असे. ५ लुगडी (लग्नाचे पिवळ खंड वरघड्या, एक जोट) घ्यावीच लागत चांदीच्या येरा, पाटल्या, जोडवे, बाउटे व नाकात सोन्याची वाळी (नथ) अपेक्षीत असे. गळ्यात सरी, साखरी अपेक्षीत असे. सांपत्तीक स्थितीनुसार त्यात फेरबदल होऊ शकत असे लग्नाचे निमंत्रण देतांना. अक्षता ठेवल्या जात अक्षता ठेऊन लग्नाची तिथी सांगितली जात असे. साधारणतः तीज (अक्षय तृतीया) होऊन ५व्या दिसा, (दिवस) ७व्या दिसा १० दिसा या प्रमाणे मुहूर्त काढला जात असे.[१९] आता हि प्रथा काही प्रमाणात माना जमातीत अस्तित्वात आहे.

लग्नसमारंभाचे निमिताने लग्नघरी काही तयारी करून घेतली जात होती.संपूर्ण घरातील जमिनीला टरवट घेतले जाई, (साधारणतः तीन बोट उंचीचे १४ ओल्या मातीचे आच्छादन) देवाचा देव्हारा सुद्धा नवीन केला जातो. जांभळीच्या काड्यांचा देव्हाऱ्यावर मांडव केला जातो त्यावर उंबरीचे व जांभूळीच्या पानाचे आच्छादन केलेले असते. मांडवाच्या चारही बाजूला आंब्याच्या पानाचे तोरण बांधलेले असते. लग्नविधीकरिता करण्याकरिता मंडप अंगणात टाकला जातो. सोयरे मंडळी व गावातील तरुण मंडळी जंगलात जाऊन डेळी, फाटे व बांबू तोडून बैलगाडीत भरून आणतात. संपूर्ण नवीन ऐवजाचा मंडप टाकला जातो त्यावेळी महीला मंडळी मंडप उभारणीची गाणी म्हणतात, त्यातील काही अंश

आरे मंडपा सोभिवंता सोभिवंता
तुले का सोबते!
मले का सोबते सोबते
मोवईचा मुंडा
आरे मंडपा सोभिवंता सोभिवंता
तुले का सोबते।
मले का सोबते सोबते
मोवईचे डार (उंबरीचे डार असेही म्हटले जाते)[२०]

लग्नमंडप प्रामुख्याने नव डेरी (खाब) चा असतो. गरजेनुसार विस्तारीत मंडप केला जातो.नऊ डेळीच्या मंडपात मधोमध बोवले घातले जाते मंडपात लग्नघराच्या दाराच्या उगव्या बाजूला सोबत मातीची दोन मडकी अर्धवट पुरली जाते त्यात हळद कुंकू, अक्षता टाकल्या जातात. पिवळ्या रंगाच्या कापडामध्ये सुपारी, हळदकुंकू घालून त्यांच्या गाळी पाडल्या जातात व ते

कापड मडक्याच्या सभोवताल गुंडाळली जाते. मंडपाला जांभूळीच्या व उंबरयाच्या पानाचे आच्छादन जाते. त्याला (ओला) मांडव म्हणत. 'उंबर जांभूरची शित साऊली' लग्नाचे गाण्यातील हि ओळ याबाबतीत सूचक आहे. लग्नमंडपाचे दर्शनी द्वारावर दोन लांब बांबू गाडून त्यावर आंब्याच्या पानाचे तोरण लावले असते. मंडप आंब्याच्या तोरणाने सजविला जातो, सुताने सुतरला जातो हे काम प्रामुख्याने मामा करीत असतो.[२१]

लग्न समारंभ कार्यक्रम ५ दिवस चालत असतो. पहिल्या दिवशी देवादेवीचा कार्यक्रम देव्हाऱ्यामध्ये कुळदेवांची स्थापना केली जाते. कुळदेवतेचे स्मरण व आराधना करण्या करिता, डायका पाडून जागरण केले जाते यावेळी रंजकता आणण्यास भगताची भूमिका प्रमुख्य असते. डायकाचे गायन वादनाचे वेळी कुळातील वडील माणसे कुळदेवता कुळातील मेलेल्या व्यक्तींची नावे सांगतात व त्या आधारावर डायका करणारे गायन करतात.

दुसऱ्या दिवशी वराची वरात वधूकडे जाणार असते, भल्या सकाळी वराला आघोळ घालून हळद लावली जाते कपाळाला मळवट अक्षता गालाला गुलाल लावला जातो. नवीन कपडे घातले जातात. कपाळावर सिंदीच्या पानोळ्यांनी तयार केलेली सुशोभीत बासिंग बांधले जाते. व डोक्यावर घोंगडयाची घोंगुट (घुंघट) अश्या प्रकारे त्याची तयारी केली जाते. पाच सुवासिनी त्याला ओवाळीत हळदीचे वेळी गाणी म्हटली जात. त्यातील काही अशी

चढ़ व चढ व हरदाई हरदाई
कशी चढू मी एकली ?
कशी चढू एकली एकली नारायण देवाने रोकली.
चढ़ व चढ़ व हरदाई हरदाई
कशी चढू मी एकली?
कशी चढू एकली एकली मारुती रायान रोकली.

साधारणतः दुपारनंतर नवरदेवाची वरात वधुगृ हीजात असे. वरात जायला निघण्यापूर्वीचा जाण्याचा अंश

बापू माह्या नवरदेवा नवरदेवा
दुसरी सार होजो
बापू माह्या नवरदेवा नवरदेवा
ऊन टारुन जाजो
कशी ऊन टारु मात दारु मात
सयवरा होईल रात
सासरा महा दसरथ दसरथ मंडपी पहिल वाट
सासू माही केरामती केरामती हार का गुंफित होती.[२२]

डफरा (एक वाद्य विदर्भामध्ये असलेले) सैनी (सनयी) च्या गजरात वरात वधुच्या गावी पोहोचल्यानंतर मारुतीच्या जवळ किंवा गवात प्रवेश घेताना रस्त्यावर मानपानाचा कार्यक्रम होतो दोन्ही व्याही किंवा कुळातील जेष्ठ मंडळी एकमेकांना पानसुपारी व नारळाची भेट देतात. दोन्ही बाजूनी गुलाल उधळला जातो. जानोशावर वराड्याची निवास व्यवस्था केली जाते. बहुदा जानोसा गाव पाटलाच्या घरी दिला जातो जानोसा देताना देखील काही संकेत पाळावे अशी अपेक्षा असते.

'ज्या घरी आंब्याचे तोरण आंब्याचे तोरण त्या घरी जानुमा देजो' अशी एक गाणे माना समाजातः प्रचलित आहे. वर वधूकडे एकमेकांची हळद पोहचल्यानंतर वर वधूला बोहोल्यावर आणण्याची कामगिरी मामाकडे असे. 'लगन लागल सावधान' च्या गजरान अंतरपाट दूर केला जातो वधूच्या गळ्यात वर गरसुरी (मंगळसूत्र) बांधत असतो. ओंजळीतील अक्षता वधूवर एकमेकाचे डोक्यावर टाकत वधू वराचे पाया पडत असते. लग्नविधीनंतर स्नेहभोजनाचा कार्यक्रम असतो.[२३]

तिसऱ्या दिवशी सायंकाळी वधूवरांची वरात निघाण्यापूर्वी दिव्याचा कार्यक्रम होतो.वधूचे मामा हा दिवा सुताने सजवित असतात. वाजत गाजत हा दिवा वधूवरांना जानोशावर पोहचवत असतात.त्यावेळी दिव्याची गाणी म्हणत. वधू वरांची वरात वराच्या घरी जाण्यासाठी निघटे वराकडे वरात गेल्यानंतर जानोश्यावर दिवे ओवाळणिचा कार्यक्रम होतो. पती-पत्नीच्या ५. जोड्या वधूवरा भोवती आरतीप्रमाणे दिवे फिरवून ओवाळता.

चौथ्या दिवशी वराकडे गोड जेवणाच्या कार्यक्रम असतो सायंकाळी वधू कडील वऱ्हाडी मंडळी वधूला घेऊन तिच्या माहेरी परत नेतात. पाचव्या दिवशी दोन्ही पक्षाकडे (वरवधू)पाहुण्यांना मांडव उजवणी प्रित्यर्थ देवादेवीचे दिवशी भाव दिलेला कोंबडा किंवा बकरा याचे तिखट जेवण होते.[२४]

### ३.४.२ गोंड जमातीचे विवाह कार्यक्रम -

गोंडाची विवाहाची मुलभूत वैशिष्ट्येही वेगळी नाहीत, परंतु त्याचा विवाह विविध विधींनी व्यापलेला आहे आणि हे विधी ते आजही मोठ्या निष्ठेने जोपासत असताना दिसतात. गोंडामध्ये, एकूण ५४ उपजमाती या आढळतात, त्या जमातीमध्ये थोडयाफार फरकाने विधी दिसून येतात पण गोंडामध्ये समदेव किंवा गोत्रा (एकच) मध्ये विवाह होत नाही आणि चुकून विवाह झालाच तर त्यांना वाळीत टाकले जाते कारण हा विवाह बहिण-भावाचा ते मानतात.

**पारा (हळद लावणे) -**

पारा टाकणे म्हणजे हळद लावणे होय. वराला घरच्या अंगणात बसवून बाजूला पाच गाडगे दोराने बांधतात, नंतर कुमारिका नवरदेवास उंबराच्या पानाने हळद लावतात व गाणे म्हणतात, नंतर वरास अंघोळ घालतात.

**देवांचा विधी (बये जेवून) नावाचा विधी -**

गोंड जमातीमध्ये हळदीच्या आगोदर हा विधी केला जातो. गावा शेजारची देवी (शांतता निर्माण करणारी) देवीस कोंबडे, बकऱ्याचा बळी देवून गावातील लोकांना जेवणाचे निमंत्रण दिले जाते, मग जेवणानंतर गाणे म्हणतात. या स्त्रीया सर्वच देवाना हळद अर्पण करतात. हे करता वेळी पाच कुमारी मुली, काही बायका प्रत्येक देवाजवळ जाऊन तेथील जमीन शेणानी सारवून त्या देवा जवळ पानावर सुपारी ठेवतात. अशी देवाची पुजा केली जाते.

**सुखेताल -**

वधुस हळद लागल्यानंतर दुसऱ्या दिवशी वराकडील सुखेताल वधुस घेण्यासाठी आलेला असतो. मग या सुखेताल सोबत गंमत केली जाते, मस्करी केली जाते. ५ १० रूपये त्यांच्याकडून घेतल्या नंतरच त्याला जेवण दिले जाते.

**मंडा जेवून (मांडवातील जेवन) -**

ग्रामीण व दुर्गम भागातील आदिवासी गोंड जमातीत हि प्रथा होती.लग्नाचा मांडव टाकल्यानंतर गोड जेवन दिले जाते. यात ज्वारीच्या कण्या, तुरीच्या डाळीचे वरण असते. हेच मुख्य जेवन होय. गोडांच्या बहुतेक जेवणामध्ये ज्वारीच्या कण्या या ठरलेल्या असतात. मग ते गोड जेवन असो की, मांस असो.जेवणास गावातील सर्वच मंडळी अमंत्रित असतात.

**मुंडा-**

आदिवासी गोंडाच्या लग्नात मुंडा म्हणजे लग्नात उभरावयाचा खांब असतो. पूर्वी हा खांब अत्यंत कलाकुसरीने तयार करत. त्यावर देवदेवताच्या आकृत्या, चंद्र-तारे, वन्यप्राणी यांची चित्रे कोरली जात, परंतु याचे प्रमाण कमी होवून साधेच लाकूड मुंडा म्हणून रोवले जाते. हा मुंडा शोधण्यासाठी देवारीसह नेमलेली माणसे जातात. जंगलातील एखाद्या मोहाच्या झाडाखाली थांबून झाडाची पूजा करतात, तेथे कोबडे बळी देवून स्वयंपाक करतात. सोबत मोहाची दारू असतेच. जेवण झाल्यावर मोहाचे लाकूड तोडतात, त्याला पांढऱ्या कपड्यात गुंडाळतात. असा मुंडा घेवून सर्वजन गावाबाहेर थांबतात, त्यांना घेण्यासाठी स्त्रिया या (वाद्यासह) जातात. त्यावेळी नृत्यकेल्या जाते, हा मुंडा मग मंडपात उभा केला जातो.[२४]

### ३.४.३ वधू शोधण्याची पद्धत -

गोंडामध्ये पूर्वी वधू शोधण्याची वेगळीच पद्धत होती. मुलाचा बाप व गावातील पंच मुलगी शोधण्यास दुसऱ्या गावात जात, तेथे गेल्यावर अमुक घरात विवाह योग्य मुलगी आहे असे समजल्यास त्या मुलीच्या अंगणात मुलाचा बाप अंगणात बांबुची काठी रोवत, त्या काठीला भाकरी अडकवत ही काठी विशिष्ट्य प्रकारची असे. मुलाच्या देवकुळाची संख्या जितकी, तितके त्या काठीस खन (डोळे) असे, मग त्या मुलीच्या घराच्यानी ती काठी पाहून विचारपूस करून त्या काठी वरचे खण पाहून ठरवले जाई. आपली मुलगी त्या घरी द्यायची की नाही. ही प्रथा आत्ताही आहे पण फारच कमी प्रमाणात बघायला मिळते, पण वधू शोधण्याची ही एक पद्धत गोंडात अशी सुद्धा आहे.

गोंड जमातीत लग्न जुळवताना पुरुषा इतकेच स्त्रीच्या मताला महत्व आहे. आवडलेल्या पुरुषाशी स्त्री विवाह करू शकते. काही विवाह मुलीच्या सोळा वर्षांच्या आत देखील होत. तरुण जोडप आपली निवड करत नंतर वैवाहिक सोपस्कार पारण्याची जबाबदारी मोठ्यांची असे लग्न जुळणीच्या वेळी वराकडील मंडळी वधूचे घरी येतात व वधूपक्षाचे अंगणात एक भाला गाडला जातो. मुलीचा पक्ष जर विवाहाला सहमत असेल तर मुलीचे वडील त्या भाल्यावर पाणी ओततात व लग्नाचे पुढील विधी पार पाडले जातात. मुलीच्या वडिलांनी पाणी टाकले नाही तर वर पक्षाला तो आपला अपमान वाटतो व वधूपक्षाला मोठा दंड ठोठावला जातो. लग्नविधीकरीता शेणाचा ओटा तयार केला जातो. त्यावर घोंगडे (लोकरी कापड) टाकले जाते. वरवधूंना त्यावर उभे करतात

लग्नाच्या विधीच्या आणाभाका घेतल्या जातात. वर वधूच्या बोटात लोखंडी अंगठी घालतो समारंभ संपतो वधू आणि वर त्याच्याकरिता तयार केलेल्या स्वतंत्र झोपडीत वास्तव्याला जातात.[२६]

### ३.४.४ आदिवासी गोंड जमातीतील विवाह प्रकार

**पळवून नेणे -**

कधी कधी वर मुलगा आपल्या सहकारयांच्या मदतीने मुलीला तिच्या गावावरून पळवून नेतो. हिन्दू विवाह पद्धतीत राक्षस विवाह पद्धत अस्तित्वात होती.या पद्धतीमध्ये मुलगी पळवून नेवून विवाह केला जातो. यात वराचे शौर्य दर्शविणे हा प्रकार दिसून येतो, तसेच गोंडामध्ये असे शौर्य प्रदर्शन करणारी प्राचीन रीत अस्तित्वात होती. एखाद्या गोंड तरूणास लग्न करावयाचे असल्यास तो स्त्रिया एकत्र येण्याची जागा हेरून ठेवत असे. अशी जागा शक्यतो जंगलामध्ये, नदी किनारी किंवा शेतात असू शके. शक्यतो गावापासून दुर अशा ठिकाणी मग तो तरूण आपल्या सहकाऱ्यासह त्या स्त्रियांवर नजर ठेवून असे. संधी साधून तो त्या तरूणीवर झडप घाले व त्याचेसहकारी त्याला मदत करी. मग त्या तरुणी सोबत असणाऱ्या तीच्या मैत्रीनी तीला वाचवण्यास मदत करी. त्या तरुणांना पळवून लावण्यास मदत करी. जर या झटापटीत त्या तरूणी जिंकल्या तर तो तरुण विवाहस अपात्र ठरवल्या जात. त्या तरुणाच्या वडिलांनी त्या मुलीच्या घरी जावून वधुपित्याला काही रकम दिली जात, जात पंचायतीनी ठरविल्या प्रमाणे ती व तो तरुण अयशस्वी ठरल्यामुळे त्याच्या सोबत त्या तरूणीचा विवाह होत नसे. कारण वराकडची मंडळी ही शौर्यवान हवी असा समज या समाजाचा होता, पण या झटापटीत तो तरुण यशस्वी झाला तर त्या तरूणीला त्याच्या सोबत विवाह हा करावा लागे व धुमधडाक्यात विवाह लावून ही दिल्या जाई. नंतरच्या काळात ही प्रथा कमी होत गेली, पुढे या प्रथेत परिवर्तन होवून मुलाचा बाप व त्याच्या सोबत मोठे लोक मुलगी पसंत करण्यास जातात. पुढे मुलास व मुलीस स्वातंत्र्य कमी झाल व जातपंचायत किंवा वडिलधारे म्हणतील तीथे विवाह करावा असा जणू नियमच बनला, परंतु सद्यस्थितीत पालक तक्रार करत आहे. आधुनिकिकरणामुळे मुले आई-वडिलांचे ऐकत नाहीत त्यामुळे परत असे म्हणता येईल की, मुलांच्या पसंतीला महत्व येत आहे, त्यातच मामाच्या किंवा जवळच्या नात्यातील मुलीशी विवाह करण्याचा प्रयत्न होत आहे.

**प्रौढ विवाह -**

गोंडामध्ये बालविवाहाची प्रथा म्हणून पूर्वीही नव्हती व आजही नाही. यालाकदाचित एखाद दुसरा अपवाद असलेली पण तोही इतर समाजाच्या संपर्कामुळे पण सद्यस्थितीत बालविवाह नसल्याचेच दिसून येते. २१ ते २५ वयोगटात मुलांचे लग्न करणे योग्य आहे, असे लोकांना वाटते. त्यावरून निष्कर्ष निघतो की, गोंडामध्ये प्रौढ विवाह प्रचलित होते/आहे असे म्हणता येईल. गोंडामध्ये प्रौढ विवाहाच होते असे म्हणता येईल कारण झटापट करू शकणारी, पुरुषांशी भांडू शकणारी मुलगी लहान आहे असे म्हणता येणार नाही. गोंडामध्ये स्त्रीया या कष्टाळू आहेत, त्यांचा उपयोग संसाराला व्हावा, काम-धंद्यासाठी व्हावा, असाच प्रयत्न गोंडाचा असतो. म्हणून ते मुलीचा विवाह लवकर करत नसावेत.

**घरजावई -**

गोंडामध्ये घरजावई ठेवण्याची प्रथा आहे. परंतु ही प्रथा सर्रास नसली तरी बऱ्याच प्रमाणात आहे. मुलीच्या वडीलाला अपेक्षित असलेले देज (हुंडा) जर मुलाचे वडील देऊ शकत नसतील तर मुलाने मुलीकडे सेवा दयावी असा प्रस्ताव ठेवला जातो. (घर जावई) सेवेचा कालावधी पाच, आठ दहा ही वर्षाचा असू शकतो. पहिल्या तीन वर्षात मुलगी समाधानी असेल तर पूर्ण लग्नसोहळा केला जातो. या घरजावई प्रथामध्ये गोंडामध्ये गैर काही मानले जात नाही. एक तरुण माणूस कामास मिळतो, मुलगी दूर जात नाही व तिचाही आपल्याला उपयोग व्हावा याच दृष्टीकोनातून घरजावई केले जाते. जातीतलाच मुलगा घरजावई गोड करतात किंवा घरी आणतात. मग ठरल्याप्रमाणे त्याचे लग्न लावून दिले जाते. गोंडी भाषेत घरजावई साठी 'लामसडे' शब्द आहे.

**प्रेमविवाह -**

गोंडामध्ये प्रेमविवाहास सर्रास मान्यता नसली तरी असे प्रेमसंबंध जुळून आल्यास जातपचांयतीच्या सल्ल्याने हे विवाह धार्मिक पद्धतीने घडवून आणले जातात, परंतु ते जाती अंतर्गत व विषम देव संख्या असणारी असावेत याविषयी काळजी घेतली जाते.

**बहुपत्नीत्व / बहुपतीत्व -**

ग्रामीण भागात बहुपत्नीत्वाची प्रथा पुर्वीपासून होती. गोंडामध्ये ही प्रथा होती, आजही आढळते. पण फारच कमी प्रमाणात, अपवादात्मक गोंड दुसरी पत्नी करताना आढळतात. गोंड स्त्रिया या पुरुषापेक्षा कष्टाळू आहेत. एकंदरीत बहुपत्नीत्व या समाजाला मान्य होते. काही अंशी आजही मान्य आहे, पण कायद्याची बंधने त्यांच्याही कानापर्यंत पोहचू लागले आहे. या उलट बहुपतीत्वाची प्रथा मात्र गोंडामध्ये अजिबात नाही, याला गोंड समाज मान्यताही देत नाही.

**सध्या गोंडाची विवाह पद्धती -**

गोंडामध्ये अगोदर वडिलांच्या पसंतीवरून मुले व मुली विवाह करत, त्यात मुला-मुलींनी आपले जोडीदार पसंत करून लग्न केल्याचे कमी आढळते, परंतु आधुनिकतेचे वारे त्याच्यापर्यंतही पोहचले, परत मुला-मुलीच्या पसंतीला महत्व देण्यात येऊ लागले. त्यातही मुली पेक्षा मुलाच्या पसंतीला अधिक लक्ष देण्यात येऊ लागले. मुलाचा बाप व मोठे व्यक्ती मिळून वधूच्या गावी जातात आणि मुलीच्या घराच्याची चौकशी करतात. मुलीच्या घरचे किती देवे आहे हे कळण्यासाठी बैठकीत तितक्या बिड्या ठेवल्या जातात. उदा. सहादेव तर (सहा बिड्या) आणि मगच बोलणी सुरु होते.

**स्त्रियांचे स्थान -**

भारतीय समाजातील इतर समाजातील स्त्रिया पेक्षा आदिवासी स्त्रीयांचे जीवन आगळे वेगळे आहे. प्राचीनकाळी आदिवासी स्त्री सुद्धा पुरूषाच्या बरोबरीने चालत होती. त्यांच्या इतर काम धंदयात स्त्री बरोबरीने मदत करीत असे. म्हणजेच आदिवासी समाजात स्त्रीचे स्थान मोठे व महत्वाचे होते. उत्तम गुणवत्तेचा परिपोष तत्कालीन आदिवासी स्त्रीयांच्या ठाई बसत असल्यामुळे घरात विद्वान स्त्री असली म्हणजे प्रतिष्ठेचे मानले जाई. त्यांच्यात वैवाहिक जीवनाबद्धल आस्था होती. मुली विवाह योग्य झाल्या की, त्यांचे विवाह करून दिल्या जात असे. आदिवासीमध्ये असलेली विवाह संस्था उच्च दर्जाची होती. त्याचप्रमाणे तिला आपल्या इच्छानुसार जोडीदार निवडण्याची मुभा आहे.

माना जमातीमध्ये स्त्रियांना आदराचे स्त्रान आहे. कुटुंब व्यवस्थेत महत्वपूर्ण जबाबदाऱ्या त्या पार पडतात. स्त्रियांचे गोंड समाजात आणि कुटुंबात महत्त्वाचे योगदान आढळते. त्या कष्टाळू असून कुटुंबाचा आर्थिक भार उचलण्यात त्यांचा हातभार लागतो. अतिमागास भागात घरातली सर्व कामे, स्वयंपाक, धान कांडून तांदूळ काढून शिजविणे, बनावरांची निगा राखून शेणगोठा करणे, शेतावर जाऊन शेतीत काम करणे, जंगलात मजुरीला जाणे किंवा 'जंगल वेचणे', घरी सर्पणासाठी जंगलातून लाकूड तोडून मोळ्या आणणे, घरच्या लहानग्यांची देखभाल करणे इत्यादी सर्व कार्ये त्या करतात. [२७]

**३.५ जन्मसमारंभ -**

जन्म समारंभाचे वेळी सात दिवसानी बाळाचे नाव ठेवले जाते. त्यात बाळाला पाळण्यात टाकून नाव ठेवले जाते, ज्वारीच्या घुगरयाचा प्रसाद वाटला जातो.

गोंड आदिवासी जमातीत मूल जन्मल्यानंतर नवव्या दिवशी जेवण दिले जाते. नंतर नामकरण विधी केला जातो. नामकरण विधी एक महिन्याने किंवा धानाचे हंगामाचे वेळी किंवा मोहफुलाचे हंगामाच्या वेळी केला जातो. नाव ठेवताना कोणते नाव ठेवावे या बाबतीत दुमत झाल्यास एक फडक्यात थोडे तांदूळ बांधून ती गाठ मुलाच्या तोंडाजवळून फिरवली जाते व नावाच्या यादीमधील नावे जोरजोराने म्हटली जातात. जे नाव येताच मुलाने गाठ पकडली ते नाव ठेवले जाते व नावाचा तिढा सुटतो. पहिल्यामुलाच्या जन्मानंतर पालकांची नावे मुलाच्या नावात अंतर्भूत होतात. उदा. अपत्याचे नाव रेखा असेल तर पालक वडीलांना रेखालतपा व आईला रेखालतालनी म्हणतात.

**३.६ मद्यपान-**

माना आदिवासी जमातीमध्ये मद्यपान हा अविभाज्य भाग नसला तरी विवाह व आनंदाच्या प्रसंगी,सणउत्सवात मद्यपान करतात.मद्यपान हा गोंड जमातीच्या जीवनाचा एक भाग असून त्याला मान्यता आहे. अशी परंपरेने चालत आलेली त्यांची समजूत आहे. म्हणून त्याच्या देव-दैवताची पूजा मांस व मद्यपानाशिवाय होत नाही. मुल जन्मल्याबरोबर त्यांच्या तोंडात दारूचा थेंब टाकला जातो.पण आता हे बरयाच प्रमाणात कमी झाले आहे.तसेच मृत्यूनंतरहीत्यांच्या मुखात दारूची धार सोडली जाते. शक्यतो मोहाच्या फुलापासून ही दारू बनवली जाते. ही दारू गोंड घरीच बनवतात, पण याला व्यावसायिक स्वरूप नसते. गोंडलोक बळी देणाऱ्या बोकडालाही दारू पाजतात व नंतरच बळी देतात. सामाजिक, धार्मिक कार्यामध्ये संपूर्ण गोंड कुटूंब दारू प्राशन करून नृत्य करतात. या समाजात स्त्रीयाही मद्यप्राशन करतात. बिडया पितात, पण यात गैर ते काहीच नाही असा समज गोंडांचा आहे. मग हे मद्यपान उत्सवाच्या वेळी व पाहुणे आल्यावर आवर्जून केले जाते, पण या शिक्षणाच्या प्रभावामुळे दारू घेणे स्त्रियांनी बंद केलेले आहे ,असेच दिसते.

### ३.७ बोलीभाषा-

माना जमातीची गोंड जमाती प्रमाणे स्वतंत्र अशी बोलीभाषा नाही. बोलीभाषे संदर्भात संदर्भ उपलब्ध नसल्याने त्याची मूळ भाषा कोणती हे सांगणे कठीण आहे. तरी बहुसंख्यांक मराठी भाषिकांच्या यामुळे बहुतेक मराठी शाहीबोरी मामध्ये तर मराठी भाषा बोलली जाते. इतर भागांत जुन्या पिढीतील काही लोक स्थानिक लोकांच्या संपर्कामुळे गोंडी, तेलुगु भाषा सुद्धा बोलतात पण त्यांना मातृभाषाम्हणून मान्यता देता येत नाहीत. म्हणूनच काही ठिकाणी जी बोली भाषा असेल त्यानुसार माना जमातीतील लोकांना नावे दिली आहे. 'माना", "मानी" अथवा अनेकवचने "माने" अशुद्ध मराठी ही माना जमातीची भाषा आहे. मराठी, हिंदी मिश्रभाषा भाषा भूभागानुसार बोलली जाते. [२८] उदा. माना समाजातील जुन्या पिढीतील लोक 'येर" हा शब्द वेळ या शब्दाला अनुसरून वापरत.[२९]

बहुतेक गोंड गोंडीभाषा बोली बोलत असले तरी त्याच्या भाषेत इतर भाषेतील शब्दांचा भरणा आहेच. अहेरी जमिनदारी भामरागड परिसर तसेच गडचिरोली, धानोरा मुरुमगाव परिसराती लोक गोंडी बोलत असले तरी वैनगंगेच्या दोन्ही बाजूला हिंदी व मराठी बोलली जाते या भाषेतील शब्दप्रयोग गोंडी बोलीत करतात तर चंद्रपूर जिल्हाच्या दक्षिण भागात गोंडी बोलीवर तेलगु भाषेचा प्राभाव आहे.

गोंडांची बोलीभाषा ही गोंडी असून ती द्रविड भाषा समूहातील आहे. विभागानुसार गोंडी भाषेत फरक पडतो. छतिसगढ भागात बोलली जाणारी गोंडी हि गडचिरोली भागात बोलल्या जाणाऱ्या गोंडी भाषेपेक्षा वेगळी असल्यासे दिसून येते. प्रांतीय विभिन्नता गोंडी भाषेच्या बोलण्यात दिसून येते. गडचिरोली जिल्ह्यातील माडिया गोंडांची गोंडी भाषा त्याला माडिया भाषा म्हणतात. ती पुरातन भाषा असून त्यात भरपूर लोकसाहित्य निर्माण झाले आहे. चंद्रपूर आणि विशेषतः अहेरी, सिरोंचा या भागातील गोंडीभाषेवर तेलगुचे संस्करण मोठ्या प्रमाणात झालेले आपल्याला लक्षात येऊ शकते. यवतमाळ आणि अमरावतीच्या गोंडीवर मराठीचा तर नागपूर, गोंदियातल्या गोंडीवर हिंदीचा प्रभाव दिसून येतो.[३०]

### ३.८ वेशभूषा केशभूषा अलंकार -

माना ही जमात वनाच्या शेजारी राहत असल्यामुळे पुरुषांचा पोशाख आखुड धोतर, अंगात बांडी घालत, कधी कधी बांडी विरहीत राहात असत. तर काही अर्धनग्न राहत किंवा लंगोटी लावत असत. तर कधी वन्य पशुंचे कातडे वापरत असत. स्त्रिया एकटांगी लुगडा नेसत व जाड काचांच्या बांगड्या हातात घालत. मिश्र धातुंच्या माट्या हातात घालत. पायात काश्याच्या धातूचे जोडवे व वाक्या घालत. गळ्यात सरी, साकरी वापरीत असत. पळसाच्या झाडाच्या मुळांपासूनवाके काढुन त्या पासून दोरी तयार करुन कंबरेला बांधत. स्त्रिया गळ्यात रंगीबेरंगी दगडाचे मणी तयार करुन त्यांची माळ गळ्यात टाकत. सणा उत्सवाच्या वेळी वाघांचे दात, किंवा नखांपासून ताईत तयार करुन गळ्यात बांधत. स्त्रिया केस विंचरण्याकरीता लाकडापासून तयार केलेली फणी वापरत. टोळी व एरंडीपासून तयार केलेले तेल केसांना लावत. केस धुण्या करीता चिकन मातीचा वापर करीत असत. केसांची गाठ बांधत, गोंदन हा प्रकारसुद्धा एक प्रकारचा अलंकार होता. कानात चांदीचे कर्णफुल व कुड्या घालत. तसेच वन्य झाडांच्या फुलांपासून तयार केलेले आभूषणांचा वापर केल्या जात असे.[३१] बदलत्या काळानुसार त्यांच्यात पेहरावात बदल येत आहे. परंतु आजही ग्रामीण दुर्गम भागात परंपरागत पोशाख आजही घातला जातो.

गोंड स्त्रिया कसोट्याचे लुगडी नेसतात.त्याला दिडकी म्हणतात. कुष्ट मारून एक पाय उपडा व दुसरा झाकलेला असे नऊ वर लुगडी नेसण्याचा एक खास प्रकार त्यांच्यामध्ये हा आहे.गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम भागात राहणाच्या माहिया आदिवासी मध्ये स्त्रिया फक्त कमरेभोवती केवळ एक पांढरे फडके गुंडाळत किंवा एकदा[३२] आदिवासी समाजातील स्त्रिया व काही प्रमाणात पुरुष अलंकार परिधान करतात. गोंड जमातीमध्ये अलंकार सामान्यता चांदीचे असतात. स्त्रिया कानात डूल किंवा कर्णफुले घालतात नाकात बेसर, मुखडा, गळ्यात चांदीच्या सरी कंबरेला कबरपट्टा, हातात बांगळ्या दंडात बाहुवठ्या पायात तोरड्या आणि जोडवे घालतात. गोंड लोक अलंकारप्रिय असल्यामुळे विविध अलंकार ते घालतात. अहेरी, सिरोंचा, भामरागड परिसरात बहुसंख्य प्रमाणात असलेले माडिया गोंड यांच्या स्त्रिया गळ्यात रुपयाच्या माळा घालतात. त्याला 'झुल्कडबी' असे म्हणतात.[३३] मुलाचा जन्म झाल्या नंतर बारश्याला मुलाच्या कंबरेला करदोडा बांधण्याची पद्धत माना व गोंड या दोन्ही जमातीमध्ये दिसून येते. गोंड जमातीतील पुरुष कानात बाळी घालतात. कालपरत्वे आता गोंड समाजातील शहरात राहणाऱ्या स्त्रिया सोन्याचे दागिने वापरतात. शहरीकरण व संस्कृतीकीकरण याचा प्रभाव सर्व आदिवासी समाजावर ज्या प्रमाणे होत आहे त्याच प्रमाणे माना व गोंड या जमाती मध्ये हि राहणीमानात परिवर्तन होत असल्याचे प्रामुख्याने दिसून येते.

आदिवासी माडिया गोंडांचा पोशाख ना लंगोटी ना धोतर असा कमरेच्या भोवती दोराप्रमाणे पट पीळ घातलेले कापड व समोरच्या बाजूने ते गुडघ्यापर्यंत खाली लोंबते सोडलेले असते. मण्यांच्या माळांची त्यांच्या गळ्यात धातुचे किंवा काचेचे कडे त्यांच्या मनगटात असते. कानात घातलेल्या निरनिराळ्या धातूच्या बाळ्यामुळे (छोटे कडे) त्यांचे कान लोबलेले असतात. प्रसंगानुरूप ते त्यांच्या पद्धतीची पगडी घालतात, त्यांच्या कमरेला सुरा आणि खांद्यावर कुल्हाड हे बाहेर जातेवेळी त्याचे नित्याने

अवजार, माडीया खी जाते. भरडे बहुदा पहिल्या रंगाचे काठाला रंगीत पट्टीचे लुगडे नेसते. ती अंगात चोळी घालत नाही, त्यांच्या नवण्याप्रमाणेच त्यांचा गळा मण्यांच्या माळानी सुशोभीत करतात. चेह-यावर व हनुवटीवर त्या गोंदवून घेतात.[३४]

### ३.९ गोंदण -

इतर आदिवासी जमाती प्रमाणेच माना जमातीच्या स्त्रिया देखील गोंदवून घेतात माना जमातींच्या स्त्रिया गोंदवून घेण्याला अलंकार मानतात. विशेषकरून डाव्या हाताच्या मागच्या बाजूला अंगठ्याजवळ जवळ विंचू ,मधल्या बोटाखाली एकात एक असे दोन गोलाकार ठिपके, करंगळी खाली एक रेषाची जोडी, हातावर व पायावर कुलदैवतांची प्रतीके असलेली झाड, प्राणी, नाग, विंचू किंवा वेगवेगळे नक्षी काम शिवाय हातावर नाव कपाळावर चंद्रकोर व हनुवटीवर ठिपका, असे गोंदतांना दिसतात. घेतात मृत्यूनंतर बोलतो आपल्यासोबत येईल ही भावना त्यामागे असते.[३५]

गोंड जमातीतील स्त्रिया देखील इतर आदिवासी स्त्रियाप्रमाणे गोंदण करून घेतात. कपाळ, गाल, दंडव हात तसेच पाय व मांड्यावारही मोठ्या प्रमाणात गोंदवून घेतात.गोंड जामात मुळातच निसर्गपूजक असल्यामुळे त्याच्या दैनंदिन जीवनातही निसर्गाचा बराचसा प्रभाव दिसून येतो. स्त्रीयांच्या गोंदवून घेण्याच्या पद्धतीतही निसर्गातील विविध पक्षी, प्राणी, चिन्हे, झाडे, आकृत्या काढलेल्या दिसून येतात.[३६]

### ३.१० गोटुल / घोटुल ,युवागृह-

युवागृ हाचीविविध प्रकारची कार्ये आहेत. या कार्यावरून आदिवासी समाजात युवागृ हाचेविशेष महत्त्व आहे. युवागृ हहे आदिवासी जीवनाचे एक अविभाज्य असे क्षेत्र आहे. इतकेच नव्हे तर आदिवासींच्या सामाजिक जीवनाचे एक आगळे वेगळे असे वैशिष्ट म्हणजे युवागृ हहोय. आदिवासी समाजाच्या संस्कृतीचे जतन करण्याचे कार्य हे युवागृ हांनी केले आहे. त्यांच्या दृष्टीने युवागृ हेहे सांस्कृतिक केंद्र आहे. त्यामुळेच आजतागयत ते दिसून येतात. युवागृ हाबाबतबऱ्याच लोकांचा गैरसमज आहे. युवागृ हे म्हणजे लैंगिंक क्रियांचे केंद्र आहे. युवागृ हेहे आधुनिक काळातील क्लब प्रमाणे एक मनोरंजन करण्याचे स्थान आहे. अशाप्रकारे अनेक गैरसमज सभ्य समाजल्या जाणाऱ्या लोकांचे आहेत.

ज्या युवागृ हांनीआदिम जीवनाला स्थैर्य दिले व आदिम संस्कृती टिकवून धरली त्या युवागृ हांचेअस्तित्व दिवसेंदिवस धोक्यात येत आहे ही वस्तस्थिती आहे.

गोंडांमध्ये आणि प्रामुख्याने बस्तर विभागातले मुरिया-गोंड व भामरागड एटापल्ली तहसिलीतले माडिया गोंड यांच्यात अजूनपर्यंत 'गोटुल' अस्तित्वात आहे. त्याचा उच्चार घोटुल असा ही करतात. गावाच्या मध्यभागी घोटुल असते. ती एक मोठी झोपडी असते पूर्वापार तिच्यावर झाडपाल्याने शाकारलेले छत आढळते मात्र अलीकडे मंगलोरी कौलांचेही दिसते. लाकडी फाट्याच्या भिंती व एक प्रवेशद्वार असते. मध्यभागी एक लाकडी भिंत दिसून येते त्याचे आतून दोन भाग असतात. गोटुलला मोठे आंगण असते त्याच्या एका कोपऱ्यात एक मोठा चपटा दगड असतो त्याच्याजवळ एका दगडी हौदासारख्या साठवणीत पाणी असते. त्या दगडावर हातपाय धुण्यात येतात.[३७]

घोटुल मध्ये सायंकाळी अविवाहित मुली मुले जमतात. ते गातात नाचतात आणि रात्री घरी जातात. गोटुलमध्ये परस्परांचा परिचय मैत्री व त्यातून जोड्या ठरून लग्नही होतात. माडियांमध्ये स्त्री-पुरुष संबंधाकडे उदार दृष्टीने पाहण्यात येते. गोटुलमध्ये विवाहित स्त्रियांना प्रवेश करता येत नाही. रात्रीपर्यंत मुलामुलींची जी नाचगाणी चालता त्यांना गोटुल पाटा (पाटा म्हणजे गाणी) म्हणतात. [३८]

आदिवासी समाजातील पारंपारीक, सांस्कृतिक व सामाजिक संस्था "गोटूल" या संस्थेचे अस्तित्व संपूष्टात येत असल्याचे स्पष्ट होते. विकासाच्या प्रक्रियेत येत असलेला आदिवासी समुह आपली मूळ संस्कृती विसरत आहे व आदिवासी तरुण पिढीत झपाट्याने सांस्कृतिक परिवर्तन होत आहे हे स्पष्ट होते.

### ३.११ आहार -

माना या आदिवासी जमातीतील लोकांचा आहार अत्यंत साधा आहे. तांदळाच्या किंवा ज्वारीच्या पिठापासून तयार केलेली पातळ पेज म्हणजे "आंबिल" हे त्यांचे मुख्य अन्न होय. प्रमुख आहार ज्वारीच्या पिठाची आंबील, घाटा, कण्या, भाकर आबाडीच्या भाजीचा घाटा, मोहफुलांपासून तयार केलेले पदार्थ, मुठ्ठे, पान्होळ्या, लाख व चने एकत्रित शिजवून घुगऱ्या तयार करुन खात असत. तसेच मोहफुलांपासून तयार केलेली दारु पेय म्हणून घेत असत. वन्य पशुपक्षांची शिकार करुन त्याचे मांस भाजून किंवा शिजवून खात असत. वनामध्ये असणारी फळे व कंदमुळे कच्चे व शिजवून खात. उदा. बिब्बे भाजून खाणे, बेलाचे, कवठाचे, टेभरुन, आवळा, चिंच, चारोळी इत्यादी झाडांची फळे, मटाळुचे, सुरनाचे, पोहिनचे कंद सुद्धा भाजून खात असत. आखाडीच्या सणाच्या दिवशी वाघाळीचे फळ भाजीमध्ये टाकत असत. आहार हा झाडांच्या पानावरच घेतला जात असे. कुलदैवतांच्या झाडाच्या पानावर आहार घेतल्या जात नव्हता. वडाच्या पानात, चारोळीच्या पानात, मोहाच्या पानात, पळसाच्या

पानात या जमातीतील लोक जेवन करत नव्हते. कारण त्या लोकांचे कुळदैवत त्या झाडाखाली आहेत. उदा. जिवतोडे आडनावाचे लोक चारोळीच्या झाडाच्या पानात जेवण करीत नाही. त्यामुळे एखाद्या सार्वजनिक कार्यक्रमाच्या वेळी ह्या जमातीतील लोक आपआपल्या घरच्या पानाच्या पत्रावळी घेवून येत असत. जेणेकरून त्यांना जेवनात पत्रावळीचा व्यत्यय टाळता येत असे. कुळ्याच्या झाडाच्या फुलांची भाजी किंवा शेंगाची भाजी तयार करुन खात असत. मोहाच्या सुकवलेल्या फुलांपासून (मोहांचे) मुझे करुन खात असत. बांबुच्या कोवळ्या वास्त्यांपासून बडे व भाजी करीत असत. मासे किंवा मास भाजून किंवा शिजवून खात असत.[३९] माना जमातीच्या खानपान पद्धतीत आता मोठा बदल झालेला दिसून येत आहे. आधुनिकीकरण,नागरीकरण, संस्कृतीकिकरण या सर्व गोष्टीचा प्रभाव त्यांच्या एकंदरीत खानपान पद्धतीवर सुद्धा झालेला आहे.ज्वारीच्या कण्या, ज्वारीची आंबील हे त्यांचे  परंपरागत अन्नपदार्थ ग्रामीण भागातील माना जमातीत अत्यंत दुर्मिळपने बघायला मिळतात.

चंद्रपूर व गडचिरोली भागातील गोंड जमातीचे राहणीमान जवळून पाहण्याचा योग मला आलेला आहे. गोंड जमातीच्या खानपान संबंधित माहिती घेत असताना मला आढळून आलेली महत्वाची बाब म्हणजे गोंड जमातीतील लोक हे मांसाहारी तसेच शाकाहारी आहार करणारे आहेत. जंगल क्षेत्राशी संपर्क येत असल्यामुळे शिकार करणे व त्याचे मास खाणे हा त्यांच्या जीवनाचा महत्वाचा भाग आहे. मात्र आता बऱ्याच प्रमाणात जंगल कायदा पद्धतीमुळे शिकार करण्यावर बंधने आल्यामुळे आदिवासी जमातीची खानपान पद्धत बदलत आहे. तसीच गोंडजमातीची खानपान पद्धत सुद्धा बदलत आहे.चंद्रपूर व गडचिरोली मध्ये तांदूळ हे पिक ज्यास्त प्रमाणात पिकत असल्यामुळे तेथील लोकांच्या खानपान पद्धतीमध्ये त्याचे प्रमाण हे ज्यास्त आहे.सामान्यपणे गोंडाच्या जेवणात ज्वारीच्या उकडलेल्या कण्या, भाकरी व त्यावरून तुरीचे किंवा मुगाचे तिखट वरण. हे पदार्थ नियमित असतात. कधी-कधी भात आणि वरून टमाटे टाकून केलेले वरण असते. सभोवताली मिळणाऱ्या बिनखर्चाच्या भाज्या, तुरीच्या ओल्या शेंगा इत्यादी पदार्थ त्या-त्या हंगामात त्यांच्या जेवणात असतात. खरे तर मांसाहार हे त्यांचे आवडते अन्न असले तरी नेहमीच मांस विकत घेणे त्यांना परवडण्या सारखे नसते. त्यामुळे बहुतेक जण जंगलातील शिकार करतात. काही घरी कोंबड्या, बकऱ्या पाळतात, ज्या भागात नदी, तळे असले तेथे मासे, झिंगे, खेकडे पकडतात, तसेच दूध, दही, तुप, लोणी हे पदार्थ त्यांच्या घरात अपवादाने आढळतात. बहुतेक गोंड गाईचे, बकरीचे दूध काढीत नाहीत, वासरानेच आईचे दूध प्यावे असा प्रघात आहे. त्यांच्या घरीही क्वचित दुधाचा चहा बनतो, खासकरून पाहुण्यासाठी. गोंड आदिवासी जमातीच्या खानपानात तांदळाचा उपयोग हा मोठ्या प्रमाणात होत असल्याचे दिसून येतो तांदूळ या पासून तयार केलेली आंबील हे त्यांचे मुख्य अन्न आहे. भात तसेच तूर व इतर डाळीचा उपयोग अन्नपदार्थ म्हणून गोंड लोक करतात, कोदो, कुटकी या तृणधान्याचा उपयोग गरीब गोंड लोक आपल्या आहारात करतात. मांसाहारात शिकार करून मिळणारे विविध प्राणी हे त्यांच्या खानपान पद्धतीचा भाग आहे. त्यात रानडुक्कर, हरीण, ससा हे प्राणी गडचिरोली जिल्ह्यातील माडिया जमातीतील लोकबायसन, माकड, खार, घोरपड या प्राण्याचे मास खातात. त्याच्या मांसाहारी खाण्यातील नियमित असणारा भाग म्हणजे मासे, बकरा, कोंबडा हे असतात. गोंड जमतीच्या धार्मिक सण, समारंभ मांसाहार हा महत्वाचा घटक असतो.[४०] गोंड जमातीच्या खानपान पद्धतीत आता मोठा बदल झालेला आहे.

### ३.१२ सण व उत्सव -

मानांमध्ये आषाढी, नागपंचमी, पोळा, दिवाळी, नागदिराळी (कोदवस) माही, शिमगा (होळी) हे सण साजरे केले जातात. आषाढी, माही व नागदिवाळी या दिवशी प्रमुख्याने देवाचा खण असतो.  देव्हा-यावर त्याच्या आकारमानाचे कापड अंथरून त्यावर मुठ पुजा मांडली जाते. देव्हा-यावर तांदळाचा छोटासा ओटा करून त्यावर मुठीने तांदळाचे छोटे छोटे ढीग (भाग) टाकले जातात त्यावर सेंदूर टाकला जातो. देवाची प्रतिक असतील तर ती ठेवली जातात. तादळाच्या ढिगांची संख्या संबंधीत कुळाच्या देवाच्या संख्या नुसार ५,७,९ अशा प्रकारे असते काही जुने देव नारायण देव वगैरे जुन्या काळी नदीतील शंखांना शेंदूर लावून तयार केलेले आहे. सर्वात जुन्या देवाचे शंखही दिसत नाही. फक्त शेंदूर लावलेला मोठा गोळा दिसतो. प्रत्येक कुळांचे देवाचे ठाणे वेगवेगळ्या गावी आहेत. जसे की नन्नावरेचा नारायण देवाचे मूळ ठाणे मध्यप्रदेशात बालाघाट जिल्हात लांजी तहसीलमध्ये ठाणेगाव येथे वाघांची आलोधार उसेगावला तर घरतांची चंडी कुकड हेटीला आहे.खणाचे वेळी अक्षता, हळद, कुंकू लावून व राळीचा धूप दिला जातो. कोंबड्यांचा भाव दिला जातो. नारायण देवाची सिंदीची माळ असते. देवांना वडे, पात्या गुंडळीचे सेव, करंजी व कणकेच्या गोळया कणकेचे दिवे हयाचा नैवद्य दाखावला जातो. नारळ फोडला जातो. पूर्वी नारायणदेवाला डुकराचा (खानाऱ्या) भाव दिला जात असे.[४१]

### ३.१२.१ माना सण उत्सव-

#### मही (माही) -

माना जमातीत या सणाच्या वेळी मेलेल्या पूर्वजांना भगताच्या मार्फत(भूमक) उतरविण्याची पद्धत आहे. त्याला उतरवून देवत्व देतात. महीच्या वेळी बकरा, कोंबडा, वराह (डुक्कर) यांचा बळी दिल्या जातो. त्याचे मांस भक्षणही केल्या जाते. या सणाला

नातलगांना बोलाविल्या जाते. तसेच मोह फुलांपासून तयार केलेला सोमरस घेतात. देवाला डहाका वाजवून गोंधळ करतात. गोंधळात डफ, डहाका, चोणका, ढोलकी इत्यादी साधनांचा वापर केल्या जातो. या सणाला जमातीतील लोक विशेष महत्व देतात.[४२]

सणासोबत सांस्कृतिक कार्यक्रम आहेच आसणी (कोजागिरी पौर्णिमा) ला. दंडारीचा टायरा मारला जात असे (दंडारीच्या तालमीची सुरुवात) पित्रमोक्ष अमावस्येपासून कोजागिरी पौर्णिमे पर्यंत महिलांची विविध गाणि व खेळ असत. गाण्यामध्ये विशेषता सांसारिक जीवनातील अनुभव, सुखदुःखे तत्कालीन रुढी परंपरा यांचा उल्लेख असे उदा .

रुणझुना पाखरा जा माझ्या माहेरा<br>
माझ्या का माहेरी बाई.<br>
एक गोवरी उरपतली व एक गोवरी उरपतली<br>
दुसरी गोवरी उरपतली व दुसरी गोवरी उरपतली<br>
तिसरी गोवरी उरपतली व तिसरी गोवरी उरपतली<br>
चौथ्या गोवरी डोम्या नाग ..[४३]

दिवाळीच्या पाडव्याला गाईगोदन भरविले जात असे. व त्या रात्री दंडारिचा कार्यक्रम होत.

### ३.१२.२ गोंडांचे सण उत्सव-

गोंड आदिवासी जमातीमध्ये प्रामुख्याने नवीन धान्य उगविल्यानंतरचे सण, नवान्न खाण्याचे सण महत्त्वाचे असून यांना पंडुम, पोलवा अशी नावे आहेत. दसरा हा गोंडांचा महत्त्वाचा सण असून तो गोंडामधल्या राजसत्तेशी संलग्न आहे. अहेरीच्या जमीनदारांच्या इथला दसरा प्रसिद्ध असून हजारोंच्या संख्येने गोंड दसऱ्याला येतात. होळी, दिवाळी हे सणही ते साजरे करतात. अशा सणांना ढेमसे ही गाणी गातात.[४४]

आदिवासी हे उत्सवप्रिय असतात. अनेक वर्षांचे साहचर्य आणि सांस्कृतिक, देवघेवीतून गोंड आदिवासींनी बाह्य प्रामुख्याने हिंदू संस्कृतीतून बरेच सण स्वीकारले असावेत. त्यात प्रामुख्याने दसरा, दिवाळी, होळी यांचा उल्लेख करता येईल. परंतु ज्या भागात गोड संस्कृती अजूनही आदिम स्वरूपात आहे अशा गोंड पोटजातीत त्यांचे परंपरागत सण, उत्सवही आढळतात. माडिया-गोंडांमध्ये सणाला 'पंडुम' म्हणतात. त्यांच्यात चार पंडुम महत्त्वाचे आहेत.

- पिनु पंडुम म्हणजे पहिला पाऊस आल्यावर करण्याचा सण होय. (पिनु-पाऊस)
- बिज्जा पंडुम म्हणजे बियांची पेरणी करण्याचा सण आणि इरपा-पंडुम करतात.
- पिंडी पंडुम म्हणजे नवीन धान्याचे (तांदुळाचे) पीठ दळण्याचा सण असून त्यांच्या पशुधनाची पूजा करण्याचाही सण असतो.
- सणांसारखाच नवान्न खाण्याची सुरुवात करण्याचेही सण आहेत. त्याला 'पोलवा' म्हणतात. कुरुम पंडुम हा असाच 'पोलवा' असतो. काकडी, मोहाची फुले, मका, नवीन तांदूळ, चिंच इत्यादी सर्व खाद्यात्रांच्या खाण्याचे पोलवा व पंडुम साजरे करतात.
- मोहाच्या फुलांची दारु पिण्याच्या सणाला 'इरपा-पंडुम' किंवा 'दारु ओवाळणे' म्हणतात. मोहाची दारू तयार करण्याचे दिवस आले की, दारू प्रथम देवाला अर्पण करतात. नंतरच मग त्याचे सेवन करतात [४५]
- विज्जा पण्डुम साजरा करण्यासाठी धानाचे चरणे संपले की लोक एकत्र जमतात. पेरम्याला विचारून एक दिवस ठरवितात. मग धानाला "कोड" पाडतात.

वृक्षाच्या छायेत देवपूजा करून व प्रथम नवीन पदार्थाचा अन्नाचा नैवेद्य करून नंतर सर्वजण जेवतात. गावचे सर्व मिळून हे सण करतात. तिथे अनेक सणांना बकरा किंवा कोंबडा बळी देतात व शिजवून खातात. नंतर महूवा पितात. सर्व स्त्री-पुरुष भाग घेत असले तरी पूजेत स्त्रियांचा सहभाग नसतो. त्यांना धर्मविधीचा अधिकार नाही. भगत किंवा पेरमा, पुजारी हे त्यात महत्त्वाचे असतात.[४६]

### ३.१३ अंधश्रद्धा -

आदिमांच्या धर्मव्यवस्थेशी जादूचा फार मोठ्या प्रमाणावर संबंध आहे. धार्मिक विधि करणाऱ्या पुरोहिताबरोबरच जादूटोणा करणाराही असतो. कधी या दोन वेगळ्या व्यक्ति असतात तर कधी एकच व्यक्ती असते.

माना या जमातीत अंधश्रद्धा अजूनही काही प्रमाणात पहावयास मिळते. जादू टोण्यावर, चेटूक करण्यावर, मंत्रा तंत्राने आजार बरे करण्यापासून तरबळी देण्या-घेण्यापर्यंतच्या तंत्रविद्येवर, भुताटकीवर विश्वास ठेवतात. शिक्षणाचे प्रमाण कमी असलेल्या ग्रामीण भागात विज्ञानावर विश्वास ठेवत नाहीत, त्यामुळे तंत्रशुद्ध ज्ञानाचा अभाव मोठ्याप्रमाणावर आजही आढळतो. त्यामुळे ह्या जमातीतील लोक भोंदू मांत्रिकांच्या व भगतांच्या मानसशास्त्रीय दबावाला काही बळी पडतात. प्रसूतीच्या वेळी अशक्तपणामुळे किंवा प्रसूतीच्या अवघडपणामुळे किंवा गरोदरपणातील आजारामुळे मृत्यूपावलेल्या स्त्रियांच्या भुताटकीवर किंवा एखाद्या अविवाहीत तरुणाचा अपघाती किंवा एकाएकी तडफाफडकी मृत्यू झाल्यास, त्याच्या भुताटकीवर विश्वास ठेवतात. आणि

तंत्रमांत्रिकाच्या सल्यानुसार कोंबडे, बकरे अथवा वराह यांचा बळी दिल्याशिवाय विधिपूर्वकभुताटकीचा बंदोबस्त होत नाही, असा समज आजही रुढ असल्यामुळे, ग्रामीण भागात ह्या अंधः विश्वासाचा प्रभाव आढळतो. या जमातीतील लोकांचा शकुन-अपशकुनावर सुद्धा मोठा प्रभाव आढळतो. सण-उत्सवाचे वेळी किंवा अंधश्रद्धेतून आरंभलेल्या पूजेच्या वेळी घरातील स्त्री रजस्वला नसावी असा दंडक आहे. व तो कटाक्षाने पाळला जातो. असे काही असल्यास नियोजित कार्यक्रम इतरवेळी साजरा करण्याची प्रथा आहे. कुठलाही सांस्कृतिक कार्यक्रम देवीदेवतांना बळी देवून व मोहफुलांपासून तयार केलेले मद्य प्राशन केल्याशिवाय कार्यक्रम पूर्ण होत नाही.[४७]

जादूटोन्या विषयी गोंडांच्या मनात अतिशय राग असतो. जादूटोणा यावर त्यांचा पूर्ण विश्वास आहे. अदृष शक्ती जादूमुळे जागृ त केली जाते व आपल्या शत्रूवर शत्रूच्या गावावर ती शक्ती पाठवून विनाश घडवून आणला जातो. जर एखाद्या व्यक्तीवर जादूटोन्याचा संशय असेल तर त्याला सामुहीक रित्या सभेमध्ये बोलावून शिक्षा दिली जाते.[४८]

### ३.१४ पंचायत पद्धती :

"माना" हे टोळ्या टोळ्यांनी अथवा समूहाने राहात असल्यामुळे, प्रत्येक गावा गावामध्ये माना जमातीचे पंचायत पद्धती रुढ होती. गावातीलच प्रमुख, जमातीतील वयोवृद्ध श्रीरामे व दडमल ह्या कुळांचे लोक पंचायत प्रमुख असत. पंचायत प्रमुखास शेंड्या असे म्हणत. कालांतराने शेंडे हे नाव कुळासारखे रूढ झाले. ह्या पंचायतीच्या सल्ल्याने जमातीतील सर्व कामे होत असत. सांस्कृतिक, धार्मिक कार्यक्रमानिमित्त अथवा जमातीमध्ये वादविवाद झाल्यास जमात पंचायत भरत असे. त्यांनी दिलेला निवाडा अंतिम मानत असे. जमातीच्या रुढी, परंपरा बंधनकारक असून, सांस्कृतिक ठेवा म्हणून जपणे, न पाळल्यास दंड करणे, बहिष्कृत जमात बांधवांना दंड करून, शुद्धीकरण करून, जमातीत परत घेणे, ई. कार्य पंचायती मार्फत होत असे. कुणी एखाद्याने तोंडाने वाहाण/जोडा मारतो म्हटले तरी त्याला जमात विठाळ ठेवीत असे. व बहिष्कृत करीत असे. अशा व्यक्तीकडून दाढी, मिशी, शेंडी, मुंडन करून नदी-नाल्याच्या पाण्यात तीन वेळा डुबकी करायला लावत व दंड वसूल करून गावकुसा बाहेरील नदी-नाल्याच्या काठावर मोहफुलांचे मद्य सेवन करीत व दंड म्हणून वसूल केलेले कोंबडे / बकरे यांचे जेवण केल्या शिवाय, व त्याला पंचायतीने शुद्ध झाल्याचे जाहीर केल्या शिवाय, जमातीत परत घेत नसत. ही संपूर्ण जमात पंचायतीच्या जरबेत असे. जात पंचायत प्रथा आता माना समाजात दिसून येत नाही.

### ३.१५ माना समाजाचे मृतांचे अन्त्यसंस्कार -

माना जमातीत मृत व्यक्तीचे दहन किंवा दफन करतात.माना. दफन विधीमध्ये मृताचे पाय दक्षिणेकडे असत. मृत झालेल्या दिवसापासून तीन दिवस पर्यंत सुतक पाळले जाते. या दिवसात कुळातील कोणतीही व्यक्ती घरात चित वावरत नसे. अन्त्यविधीच्या दिवशी कुळाच्या व्यक्तीकडून स्वयंपाक शिजवीला जात नसतो. गावातील सोयरे नातेसंबंधातील लोक शिजविलेले अन्न आणून देत त्याला कडू घास उसे म्हणतात. तिसऱ्या दिवशी मृतांच्या अस्थी आणि राखेचविसर्जन केले जाते. अस्ती आणि राख गोळा करण्यास नातेवाईक व गावातील आत्मिय मंडळी येतात. तेथे राखेच्या ढिगाऱ्याची विधीवत पूजा केली जात असते. घरातली ज्येष्ठ मुलाकडून जर मुलगा नसेल तर कुळातील भाऊ किंवा भावाची मुल त्यांच्या कडून अस्ती विसर्जन केले जाते. घरातील सर्व कपडे धुऊन काढले जातात. संपूर्ण घर भिंतीसकट साफसूफ करून सारवले जाते. गोमूत्र शिंपून शुद्धीकरण करतात. गावाबाहेरील मोठ्या झाडाखाली शक्य असेल तर सोयऱ्यांच्या घरी शुद्धीकरणाचा स्वयंपाक केला जातो. जेवण झाल्यावर खांडपान दिले जाई खांडपान हा शब्दप्रयोग असला तरी प्रत्यक्षात सुपारीचे खांड दिले जात असे. मृतांच्या कुळातील पुरुषांना एका ओळीत बसवून सोयऱ्यातर्फे त्यांना सुपारीचे खांड देऊन नमस्कार केला जातो.तिसऱ्या दिवसाला जर कोणी सोयरे येऊ शकले नाही तर इतर दिवशी ते खांडपान देण्यासाठी अगत्याने जातात. खांडपान दिल्याशिवाय ते एकमेकांच्या घरी जेवण करीत नाहीत. सवडी नुसार मृत व्यक्तीची धातुची प्रतिमा करून तीला अगोदरच्या देवांच्या प्रतिमेमध्ये मिसळण्याचा कार्यक्रम होई त्याला 'देवकारण' किंवा देव घडविणे म्हणत. धातुची प्रतिमा घडविण्याच्या पूर्वीच्या काळात शंखाला किंवा हळकुडला शेंदूर लावून अशा प्रतिमा केल्या जात. अशा प्रकारच्या शेंदरी देवांच्या प्रतिमा आजही आमच्या कुळचारात आहेत. यावेळी प्रमुख्याने देवांचे स्तवन करण्याकरिता 'डायकांचा ' कार्यक्रम होई प्रसंगी भगत त्या प्रसंगाचे नाटिकरण करी.

### गोंड जमातीचे मृतांचे अन्त्यसंस्कार -

कॉलरा देवी सारख्या साथीच्या रोगाने मेलेल्या व्यक्ती व लहान मुले ह्यांचे दफन करतात. इतरांना अग्नी दिला जातो, मृताची टिकूरी फोडली जाते. प्रेत वाहून नेणारे दहनाचे ठिकाण सोडतात जवळच्या ओढयात आंघोळ करतात. मेजवानी बहुदा बकरा कापला जातो. लाकडी जाड कुऱ्हाडीने एक घावात जनावराचे मुंडके छाटले जाते. जेवण झाल्यावर स्मशानातील मंडळी घरी येतात व तीन दिवसाचे सुतक पाळले जाते. ज्या ठिकाणी प्रेत जाळले जाते तेथे लहान स्मारक बांधले जाते. बहुदा त्यात

मातीचे मडके पुरतात त्यात छोटी नाणी टाकली जातात, माडीयामध्ये अत्यविधीच्या जागेवर उभा दगड किंवा लाकडी स्तंभ गाडला जातो.

**तळटीपा-**

1. Gajbe Rameshkumar,Mana (Scheduled Tribe A Compiled Study)
2. देवगांकर शैलजा, आदिवासी विश्व, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूरपृष्ठक्र. ४
3. Gajbe Rameshkumar, Mana (Scheduled Tribe A Compiled Study)
4. देवगांकर शैलजा,आदिवासी विश्व, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूरपृष्ठक्र. ६
5. कित्ता पृष्ठक्र. ११
6. संगवे विलास,आदिवासींचे सामाजिक जीवन एक सामाजिक मानवशास्त्रीय अभ्यास,पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पृष्ठक्र. ७७
7. प्रत्यक्ष निरीक्षण खैरगाव, ता.वरोरा जि.चंद्रपूर, दिनांक २०/०८/२०१६
8. प्रत्यक्ष निरीक्षण खैरगाव, ता.वरोरा जि.चंद्रपूर, दिनांक २०/१०/२०१७
9. Chanda District Gazetteers Volume A (Page Tto 102)
10. कित्ता पृष्ठक्र.१०२
11. कित्ता पृष्ठक्र.१०२
12. कित्ता पृष्ठक्र.१०२
13. कित्ता पृष्ठक्र.१०२
14. प्रत्यक्ष निरीक्षण सालोरी, ता.वरोरा जि.चंद्रपूर,दिनांक २०/०५/२०१८
15. Chanda District Gazetteers Volume A (Page no 102)
16. गजबे रमेशकुमार 'माना' अनुसूचितजनजाती संकलित अध्ययन' आनंद,प्रकाशन,नागपूर, २००५,पृष्ठक्र.५६
17. प्रत्यक्ष निरीक्षण सालोरी, ता.वरोरा जि.चंद्रपूर, दिनांक २०/०५/२०१८
18. प्रत्यक्ष निरीक्षण सालोरी, ता.वरोरा जि.चंद्रपूर, दिनांक २०/०५/२०१८
19. प्रत्यक्ष निरीक्षण सालोरी, ता.वरोरा जि.चंद्रपूर,दिनांक २०/०५/२०१८
20. प्रत्यक्ष निरीक्षण सालोरी, ता.वरोरा जि.चंद्रपूर, दिनांक २०/०५/२०१८
21. प्रत्यक्ष निरीक्षण सालोरी, ता.वरोरा जि.चंद्रपूर, दिनांक २०/०५/२०१८
22. देवगांवकर एस.जी.,देवगांवकर एस.एस.,गोंड,परधान आणि कोलाम,श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर,२०११, पृष्ठक्र.२३
23. प्रत्यक्ष निरीक्षण खैरगाव, ता.वरोरा जि.चंद्रपूर, दिनांक १८/०५/२०१९
24. Chanda District Gazetteers Volume A (Page no 102)1909
25. कित्ता पृष्ठक्र.१०३
26. देवगांवकर एस.जी.,देवगांवकर एस.एस.,गोंड,परधान आणि कोलाम,श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, पृष्ठक्र.५
27. गजबे रमेशकुमार 'माना' अनुसूचितजनजाती संकलित अध्ययन' आनंद,प्रकाशन,नागपूर, २००५,पृष्ठक्र.५६
28. प्रत्यक्ष निरीक्षण खैरगाव, ता.वरोरा जि.चंद्रपूर, दिनांक १८/०५/२०१९
29. देवगांकर शैलजा,आदिवासी विश्व, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर,पृष्ठक्र. ११
30. जांभुळे म.सि.,माना जमातीचा सामाजिक व सांस्कृतिक इतिहास,प्रकाशन,मा.म.समिती नागपूर,२००७ ,पृष्ठक्र.१९
31. देवगांकर शैलजा,आदिवासी विश्व, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर,पृष्ठक्र. ११
32. एस.जी.देवगांवकर,एस.एस.देवगांवकर,गोंड,परधान आणि कोलाम,श्री साईनाथ प्रकाशन, नागपूरपृष्ठक्र. ६
33. Chanda District Gazetteers Volume A (Page no 102)
34. गजबे रमेशकुमार 'माना' अनुसूचितजनजाती संकलित अध्ययन' आनंद,प्रकाशन,नागपूर, २००५, पृष्ठक्र.५६
35. देवगांकर शैलजा,आदिवासी विश्व, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूरपृष्ठक्र.१२
36. देवगांवकर एस.जी.,देवगांवकर एस.एस.,गोंड,परधान आणि कोलाम,श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर,२०११, पृष्ठक्र.७
37. कित्ता पृष्ठक्र.७
38. जांभुळे म.सि.,माना जमातीचा सामाजिक व सांस्कृतिक इतिहास,प्रकाशन,मा.म.समिती नागपूर,२००७ ,पृष्ठक्र.१८
39. Chanda District Gazetteers Volume A (Page no 102)
40. जांभुळे म.सि.,माना जमातीचा सामाजिक व सांस्कृतिक इतिहास,प्रकाशन,मा.म.समिती नागपूर,२००७ ,पृष्ठक्र.१९
41. कित्ता पृष्ठक्र.१९
42. प्रत्यक्ष निरीक्षण खैरगाव, ता.वरोरा जि.चंद्रपूर, दिनांक ३०/०५/२०१९

43. देवगांवकर एस.जी.,देवगांवकर एस.एस.,गोंड,परधान आणि कोलाम,श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर,२०११, पृष्ठक्र.१५
44. कित्ता पृष्ठक्र.१५
45. कित्ता पृष्ठक्र.१५
46. गजबे रमेशकुमार 'माना' अनुसूचितजनजाती संकलित अध्ययन' आनंद,प्रकाशन,नागपूर, २००५, पृष्ठक्र.५६
47. मडावी, एस.एन.,गोंडवानाचा सांस्कृतिक इतिहास,सुधीर प्रकाशन,वर्धा-२०११ पृष्ठक्र.१२१